Astro • Puja • Vastu

|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## अन्नप्राशन (बोळवण)

बाळाला जेव्हा पेय पदार्थ, दूध यांच्या व्यतिरिक्त अन्न देण्यास प्रारंभ केला जातो, तेव्हा हा शुभारंभ यज्ञीय वातावरणात आणि धार्मिक स्वरुपात करण्यात येतो. या प्रक्रियेलाच अन्नप्राशन संस्कार असे म्हणतात. बाळाला दात येणे म्हणजे त्याला पेय व्यतिरिक्त खाद्य पदार्थ देता येण्याच्या पात्रतेचा संकेत आहे. त्याप्रमाणे हा संस्कार सहाव्या महिन्याच्या जवळपास करण्यात येतो. अन्नाचा शरीराशी अगदी जवळचा संबंध आहे. मनुष्य आणि प्राणी यांचा बहुतेकसा वेळ आहार व्यवस्थेतच जातो. त्याचे योग्य ते महत्त्व ओळखून त्याला सुसंस्कार युक्त बनवून घेण्याचा प्रयत्न करणे योग्यच आहे.अन्नप्राशन संस्कारात देखील असेच होते. चांगली सुरुवात म्हणजेच अर्धी सफलता. तेव्हा बाळाच्या अन्नाहाराच्या क्रमाला श्रेष्ठात श्रेष्ठ सस्कारयुक्त वातावरणात करणेच अभिष्ट आहे. आपली परंपरा अशीच आहे की भोजनाचे ताट समोर येताच अगोदर त्यातील मुंगी, पक्षी, कुत्रा इत्यादींचा भाग बाजूला काढून आहुती देण्यात येते भोजन ईश्वराला मनोमन अर्पण करून किंवा अग्नीत आहुती देवून मगच ग्रहण केले जाते. होळीचे पर्व तर याच प्रयोजनासाठी आहे. नवीन पिकापैकी एकही दाणा मुखात घेण्या अगोदर आधी त्याची आहुती होलिका यज्ञात देण्यात येते. तेव्हाच ते खाण्याचा अधिकार प्राप्त होतो. शेतकरी जेव्हा कापणी, झोडपणी वगैरे उरकून

धान्याची राशी तयार करतो, तेव्हा आधी त्यातील एक टोपलीभर धान्य धर्म कार्यासाठी बाहेर काढून मगच उरलेले धान्य घरी घेऊन जातो. त्यागाच्या संस्कारासोबत अन्नाचा प्रयोग करण्याच्या दृष्टीनेच धर्मघट अन्नघट ठेवण्याची प्रथा प्रचलित आहे. भोजनाच्या पूर्वी बलिवैश्व देव प्रक्रिया देखील अन्नाला यज्ञीय संस्कार देण्यासाठी करण्यात येते.बालकाला प्रथमच घन पदार्थ (Solid Food) भरवतात. बालकाला निरनिराळ्या पदार्थांची रुची निर्माण व्हावी तसेच त्याची पचनशक्ती वाढावी हा या संस्कारामागील हेतू आहे. त्याचे योग्य ते महत्त्व ओळखून त्याला सुसंस्कार युक्त बनवून घेण्याचा प्रयत्न करणे योग्यच आहे.

### अन्नप्राशन संस्कार मुहुर्त

सहावा, आठवा, दहावा, बारावा या मासीं अथवा पूर्ण वर्ष झाले असतां त्या काळी पुत्राचा अन्नप्राशन संस्कार करावा. पांचवा, सातवा, नववा या मासीं कन्याचे अन्नप्राशन करावे. द्वितीया, तृतीया, पंचमी, सप्तमी, त्रयोदशी आणि दशमी ह्या तिथि, बुध, गुरु, शुक्र हे वार शुभ, रवि, चंद्र हे वार क्वचित् ग्रंथांत सांगितले आहेत. अश्विनी, रोहिणी, मृग, पुनर्वसु, पुष्य, तीन उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, श्रवण, धनिष्ठा, शततारका आणि रवती ही नक्षत्रे शुभ, जन्मनक्षत्र शुभ असें कोणी ग्रंथकार म्हणतात. भद्रा, वैधृति, व्यतिपात, गंड, अतिगंड, वज्र, शूल, परिघ हे योग वर्ज्य करावेत.

### अन्नप्राशन संस्कार विधी

यजमानानें आचमन करून प्राणायाम करावा. देशकालाचें स्मरण करून माझ्या ह्या बालकाला मातेच्या गर्भातील मलायें प्राशनापासून झालेल्या दोषांचा नाश, शुद्ध अन्न इत्यादिकांची प्राप्ति, ब्रह्मवर्चस तेजाचा लाभ, इंद्रियें आणि आयु ह्यांची सिद्धि, बीजगर्भापासून झालेल्या पापाचें निरसनद्वारानें श्रीपरमेश्वराची प्रीति होण्याकरितां अन्नप्राशन नांवाचा संस्कार करीन असा संकल्प करून, त्याचें अंगभूत गणपतिपूजन, स्वस्तिवाचन आभ्युदयिक करून बालकाला अलंकृत करून पूजा आणि उपहार इत्यादिकांनीं इष्टदेवतेची पूजा करावी, त्या देवतेच्यापुढे आपल्या उजवीकडे शुभवस्त्रावर मातेच्या मांडीवर पूर्वेस तोंड करून बालकास प्रथम अन्नप्राशन करवावें. दधि, मधु, तूप ह्यांनी युक्त असें अन्न सोन्याच्या अथवा कांसाच्या पात्रात ठेवून अन्नपते०" हा मंत्र बोलून सुवर्णयुक्त हातानें अन्न घेऊन पहिला घास खाववून मग पोटभर जेवण घालून मुख धुवून बालकाला पृथ्वीवर बसवून त्याच्यापुढे पुस्तक, शस्त्र, वस्त्रे इत्यादि शिल्पसाधनें जीविकेचीं परीक्षा करण्याकरिता ठेवावींत. बालक आपल्या इच्छेनें ज्यास प्रथम स्पर्श करील तें त्याचें जीविकासाधन यजमानानें आचमन करून प्राणायाम करावा. देशकालाचें स्मरण करून माझ्या ह्या बालकाला मातेच्या गर्भातील मलायें प्राशनापासून झालेल्या दोषांचा नाश, शुद्ध अन्न इत्यादिकांची प्राप्ति, ब्रह्मवर्चस तेजाचा लाभ, इंद्रियें आणि आयु ह्यांची सिद्धि, बीजगर्भापासून झालेल्या पापाचें निरसनद्वारानें श्रीपरमेश्वराची प्रीति होण्याकरितां अन्नप्राशन नांवाचा संस्कार करीन असा संकल्प करून, त्याचें अंगभूत गणपतिपूजन, स्वस्तिवाचन आभ्युदयिक करून बालकाला अलंकृत करून पूजा आणि उपहार इत्यादिकांनीं इष्टदेवतेची पूजा करावी, त्या देवतेच्यापुढे आपल्या उजवीकडे शुभवस्त्रावर मातेच्या मांडीवर पूर्वेस तोंड करून बालकास प्रथम अन्नप्राशन करवावें. दधि, मधु, तूप ह्यांनी युक्त असें अन्न सोन्याच्या अथवा कांसाच्या पात्रात ठेवून अन्नपते०" हा मंत्र बोलून सुवर्णयुक्त हातानें अन्न घेऊन पहिला घास खाववून मग पोटभर जेवण घालून मुख धुवून बालकाला पृथ्वीवर बसवून त्याच्यापुढे पुस्तक, शस्त्र, वस्त्रे इत्यादि शिल्पसाधनें जीविकेचीं परीक्षा करण्याकरिता ठेवावींत. बालक आपल्या इच्छेनें ज्यास प्रथम स्पर्श करील तें त्याचें जीविकासाधन असे जाणावें, होम करण्याच्यापक्षी स्थालीपाक पासून करून जातकर्माप्रमानें शुचि नामक अग्नीची स्थापना करून प्रधान होमाच्या शेवटीं अन्नप्राशन आणि जीविका परीक्षण करावे नंतर स्विष्टकृत् इत्यादि होमाचा शेष पुरा करावा, म्हणजे स्थालीपाक पर्यंत संपवावा. आपल्या शक्त्यनुसार ब्रह्मणांना भोजन देऊन दक्षिणा द्यावी. त्यांकडून आशीर्वाद घ्यावा. आपल्या बंधूंबरोबर स्वतः भोजन करावें. असा हा अन्नप्राशनाचा संस्कार संपला.


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com